# माहूची मंगळागौर



किंमत २ आणे

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय जा-वा
दा. क्र. ४२८९

का. क्र. ५२८९.

# माळूची मंगळागौर

अनुक्रम 372 .... 2665 ... 3
विभाग ... आ. वा.
... 9035
3/3/59

कवी–काव्यकुमुद, राजापूर

म. ग्रं. सं. ग्रंथ, वाचनालय
क्र. ५२८९
वि. ... आ. वा.

प्रकाशक,

केशव भिकाजी ढवळे, गिरगांव–मुंबई

वैशाख, शके १८५४

इ. स. १९३२

किंमत २ आणे

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रकः—**एस्. व्ही. परुळेकर**, मुंबई वैभव प्रेस,
सँढर्स्ट रोड, गिरगांव-मुंबई.

प्रकाशकः—**केशव भिकाजी ढवळे**, रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव-मुंबई.

# निवेदन

प्रियभगिनींनो, स्वतांच्या सौभाग्यसंवर्धनास्तव व चिरकाल संसारसुखाकरितां स्त्रियांनीं मंगलागौरीचें व्रत आचरावें असें शास्त्र व अशी रूढी आहे व ती अगदीं बरोबर असल्याबद्दल दुमत असणें असंभवनीय आहे. प्रस्तुत छोटेंसें पुस्तक हें अलीकडील पद्धतीवर पण नव्या जुन्यामधील राजापुरी तोडीला अनुसरून लिहिलें आहे, तें आपणाला कितपत आवडेल तें पहावें. ह्या पुस्तकांत आधुनिक पद्धतीच्या एका वंद्य व विनयशील बालेचें एका मंगलागौरीच्या दिवसाचें पवित्र असें वृत्त काव्यामध्यें चितारलेलें आहे. हें काव्य केवळ स्त्रियांना नव्हे तर पुरुषांनाही बोधप्रद व्हावें अशा तऱ्हेचें लिहिलेलें आहे

आजकालच्या परिस्थितीचें दिग्दर्शन केलें असतां असें आढळेल कीं स्त्रीशिक्षणाचें पाऊल पुढें पडल्याशिवाय चालू स्थितीला तोंड देणें अशक्य आहे. स्त्रियांची उन्नती करण्याकरितां आज चोहोंकडे जारीनें प्रयत्न चालले असून स्त्रियांना उपयुक्त असें वाङ्मय निर्माण करणें हा एक प्रयत्न त्यांमध्यें विशेष होय. प्रस्तुत छोटेंसें पुस्तक ह्याच हेतूनें लिहिलें आहे.

पण आतां हें आमचें रुक्ष चर्वितचर्वण तुमच्या हें काव्य वाचण्याच्या हेतूनें उल्हासलेल्या चित्ताला अडथळा व कंटाळा आणण्याइतकें वाढविणें अयोग्य आहे. असो. शेवटीं ह्या पुस्तकाचा सदुपयोग करून व तदनुसारें मंगलागौरीचें मंगलपूजन करून व तिचा शुभ आशीर्वाद घेऊन आमचा पुढील ‘ दिवाळीचा दागिना पहावयाला आनंदानें व अहमहमिकेनें पुढें यावें अशी वाचक भगिनींनों तुम्हांला नम्र विनंति करीत आहें.

शेवटीं हें पुस्तक, छापून प्रसिद्ध करण्यांत रा. केशव भिकाजी ढवळे यांनीं जे परिश्रम घेतले, त्याविषयीं त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

आपला सर्वांचा कृपाभिलाषी,
काव्यकुमुद

अनुक्रम २८८५३
विभाग का. वा.
९०३५
३१/३/६१

# मालूची मंगलागौर

( कवि—काव्यकुमुद, राजापुर )

१

वृत्त-शार्दूलवि—

मासीं श्रावणमास हा मुलिमना मोदें महानंदवी,
सृष्टी सारि सुशोभिवंत सुमनालंकारिं साजे नवी;
गारीगार चहोंकडे, निशिदिनीं आनंदप्रीतीझरे,
आनंदें ललनाहृदीं झुळझुळ प्रेमाझरा पाझरे;

सृष्टीचा अति लाडका म्हणुनि का वाटे तयां लाडका ?
घेवोनी सण ये बहूत; मुदिता त्या पौर्णिमा चंद्रिका;
भासे धार्मिक थोर मोल दिवसां सर्वांसि धर्मप्रियां—
होते घाइ कधींहि ना चुकति ह्या धार्मीककार्यीं स्त्रिया !

गौरीशंकरदर्शना निघति मोदें सोमवारीं सती,
बेलाची महती किती जगतिं त्या वारीं न चाले मती !
वारीं मंगलकाल पात्रि जमवीतां भासती प्रेमला
भावें वाहति गंधपुष्पनवहारां मंगलागौरिला ॥

वृत्त-आर्याः—

पति बालक सौख्यास्तव उपवास करीति नित्य गुरुवारीं,
परदेशवासि भर्त्या भेटव सत्वरि गुरूविनांति करी,

जमवुनि सुवासिनी हळदीकुंकूं शुक्रवारिं आनंदें—
करिती; कुटुंबकल्याण विहारी निशिदिनीं मुदें नांदे !
आला शंपत शनिवार पुजीती पिंपळा प्रभातपळा,
भाविक शोडष उपचारें; वाचिति शनिमहात्म्य गोडगळां;
पूजा आदित्याची, पर[1]सुखकर पाहुनी मुखेंदु रमे;
कोमल कलिका देखुनि, त्रास न दे त्यां मनामधीं वरमे ?
माझ्या प्यार मुलींनो अपुल्यासंगें मला रमूं द्या ना,
मंगलकालीं मंगलगौरी पूजन विहार उद्यांना[2].

२

( चाल—चंद्रकांत राजाची कन्या )

मंगलपुरचा रावसाहेबांचा सुत सुस्वरुपी,
कालेजामधिं शिकोनि, झाला जीव मदनमूर्ती;
तेज सुकांती, सुशील नीती विद्यार्जनिं प्रगती,
शरदेंदु तजेला लाजवितां जन वाखाणीती.
नव नवसानें पुत्र जाहला वार्धक्यीं त्यांना.
गोविंद[3] रमाबाई आनंदीं डुलती; सोना !
तीन मुलें लाभलीं आणखीं, येती तशिं जाती
चौथी इंदू सातपावसाळ्यांची लाडकि ती !
सुन्मुखदर्शनआतुर झाली माता प्रेमानें.
स्वमनोगतसिद्धिस्तव पतिसी विनवी विनयानें;
प्राणेश्वरिची, जीवनसरितेची प्रेमाज्ञा ती.
पतिराजांनीं केलि मान्य ‘ वेदाज्ञा ’ मनिं म्हणती;

---

१ श्रेष्ठ; २ ह्या उद्यानांत विविध स्वभावी काव्यमय स्वरूपी हृदयपुष्पें खेळत वागडत असतात. ३ रावसाहेबांचें नांव.

मदनमूर्ति, विद्यामूर्ती, मनमोहन कॉलेजा
कौस्तुभमणि शोभे कीर्तीनें सरसवदनपंकजा.
रचिलें नवकाव्य ‘ प्रभातरवी ’ नव रस चारुता
बक्षिस मिळवी, लौकिकनौबद् वाजविते जनता;
कीर्तिसुसौरभ जनमुखपवनें दशादिशिं विखरतसे;
हृदयीं भरला, माधवजींच्या सदाच डुलवितसे,
आणि प्रभातरवी ’ काव्या क्षणिं भुजंग तो डोले,
आनंदाच्या बसुनि विमानीं झुळझुळ घे झोले.
सद्गुणि शहाणी कन्या मालति शुक्रेंदुसि झुरवी
तरुणि स्वरुपिणी; धन्य ! मानिती अभिमानच वाजवी !
काव्यमयतनू, काव्यमयप्रभा काव्यमयगुणाची
बालपणापासुनी लालसा काव्यश्रवणाची !
मनमोहनकृत काव्य वाचुनी मनमोहन झालें
मनमोहनमूर्तीदर्शनउत्सुक, अंतर झालें.
कांहिं सुचेना, कांहिं रुचेना, सुकल्पना नाना;
लज्जेनें हृद्गतस्फोट न करि भूषण ललनांना
कुबेरसंपत्तीपति माधवराव घरंदाज
ठरविति अंतीं मनमोहनमालतिमाधविसाज,
राम जानकी, कृष्णभीमकी सुंदरतम जोडा,
लग्न ठरविलें मुहूर्त पहिला कांहींनसे मोडा.
लग्न जाहलें प्रभात रविमीलन प्रेमभरानें
रमाबाइचे मानपान जाहाले स्वेच्छेनें !

३

( चाल—नृपममता )

लाडकी सून बाईंची
प्राणप्रिय प्यार तियेची । निश्चयें
इंदूपरी लाड करीती
धन्य ! सौजन्यपर रीती । श्वश्रुची.
ये मंगळवार पहीला
जरिकांठि शालु आणविला । प्रेम हें !
सद्‌गुणी,
सून शाहणी,
नित्य वाखाणि,
स्वर्ग देवी ती
हें भाग्य अन्य विधिलिखितीं । सत्य ना !
सोमवार उदित जहाला
स्नान करी प्रातःकाला । मालती;
तुळसिपूजनादिविधीतें
जाहले भक्तिरस चित्तें । प्रेमळें.
नणंदेसह देउळिं गेली,
प्रीतिनें शिवामुठ घाली । शिवपदीं;
तो भाव,
पाहुनी देव,
पावला राव;
तिच्या हृदयासी,

आशिर्वच दे रमणीसी । उमजला.
" जाहली घसरडी जागा,
हळुहळु पद टाका मार्गा । वा तरी !
पथिं पडाल वन्सं वरं का ?
होईल मजा सकलां का । हांसण्या ! "
यापरी लाडक्या शब्दें
मालती नणंदेसि वदे । बोधुनी.

यापरी,
उभय त्या परी,
जणूं अंबरीं;
उतरती तारा
हंसत घांटि साहितभारा । वस्तुंच्या !

.... .... ........ ... ... ... ... ... ... ....

जाति भोजनोत्तरकालीं
जमवाया प्रेमळ आली । आदरें;
धान्येंहि झालिं मोजोनी
शांति ना; चैन नाहिं मनीं । उभयतां.
सकळ जमुनि खेळीमेळी,
बेलास्तव फिरती आळी । सर्वत्या
" बालिके "
सासु कौतुकें

वाजले पांचहि न पुरते—द्विजगण मधु गीतें गाती
मालती रमण ना उठला—अभ्यासा; झोंप न पुरती;
जागृत झाल्या त्या ज्योती—कंदील घेऊन हातीं;

फिरुनियां सकल उद्यानें,
झपझप काढिति त्या सुमनें
खग लाजति ऐकुनि ग णें

भ्रमरनयानिं अश्रू आले—बालिका प्राण परि धाले!

चांफा, शेवंती, गुलाब—कर्दळि, जुइजाइ, चमेली,
कोरंटा, कांचन, कमळें—स्वर्णपुष्पि प्राजक्त फुली,
दासवंद, कर्णा, चांफा—झिनिया, गोकर्ण, वहाळी

हरणें तरणें किति तिरडा;
पत्रि लिहीतां हो खरडा,
लेखनी थकुनि जा करडा;

पातेरा सारा अणिला। छे! राग येइ मालतिला!!

नव धनिणीच्या हुकुमानें—आणिती शिपाई सारे
स्रावडें, सिताचौर किती—केतकि हाते सामोरे;
पाहुनियां पुलकित पुष्पां—हत्कळी फुले मोदभरें

काय ती घराची शोभा
निरगंध लाजवीति नभा
गृहसकल मुदीत सुमनप्रभा!

नंदनवन सदनीं आलें—वधुहृदय रंगलें झुललें

सुमनापरि हृत्पुष्प फुले—प्रथमचि; आनंद विमानीं
दुडदुड नाचतसे इंदू—‘ झालि मजा कितितरि वहिनी ’
मधुरगंध सर्वत्र भरे—गंध गंध एकच सदनीं.

प्राणापरि प्यार मनूसी
सुमनांचा लाभ तयासी
काव्यप्रतीभा हो कविसी

दृश्य हृत्पटीं कोरीलें—तें जिवंत काव्यच दिसलें
घाइ हो रमाबाईची—मंगलागौर मालतिची
पंचवीस मुलि बोलावी—फुरसत जीवासी कैची ?
पक्वान्न पुरें जिलबीचें—मोदकही, चाल जनाची

एकेक हळुहळु जमती
तारका हळुच लुकलुकती
दुरुनि वाड्यासि ये कांती

मुलि, प्रमदा ठुमकत येती—जन विस्मय पथिं गुजगुजती
आधण ठेवीत चहाचें—स्वागत करित सर्वांचें
“ दमलांत बसा ना आतां ! करितेंच चहा हो आतां ! ”
त्यांत समंजस कुणि होती “ ही कशासि खटपट करितां ! ”

दारांत आड राहोनी
ऐकलें कान देवोनी
मालती नम्र होवोनी,

“ लपतेस अशी कां बाई ? ” एक विनोदें वदलि सई
हळुच पुढें घेउनि ताटें—अरविंदें नेलिं घरांत

चाललें चहा पान पुढें—देवतां सुधा ती गमत
" पाहिजे तुला मालति का? घे घोंट एक सर्वांत !"

मालूचा येइ नकार
परि सखि आग्रह अनिवार,
" तव वांचुनि ना घेणार !

आग्रह पाहुनि सर्वांचा—घेइ घोट आनंदाचा !
ठाक ठीक होइ तयारी—पडतसे दहाचा ठोका
" हळद तेल लावुनि अंगा—राजसे अंग धू बरं का !"
जाहला हुकुम बाईंचा—प्रेमाचि खुलत चंद्रीका

सोंवळें नेसुनी सजली,
कंचुकी जरीची ल्याली,
चांफेकळि वरि खुलत फुली,

बैसल्या पूजनासाठीं—इंदु बसे मालू पाठीं;
कॉलेजवेळ जाहाली—वक्तशीर मनमोहन तो
जेवुनी तसाच निघाला—ना विचारपूस करी तो
" मोदकासि थांब जरा ना "—वृद्ध स्त्रि विनोदा श्रवतो

उत्तर दे स्मित हास्यानें
स्वर्ग आनंद लहरीनें
सागर गंभीर दिलानें

मनमोहन ऐसा राजा—अखिलांचा प्यारा कलिजा
भटजींची अतिशय घाई—लग्नांत इतुकि ना झाली

तें चरित्र वर्णूं काय ? देवगुरू स्वारी आली
बर्फाच्छादित शिरशोभे–पगडीचि पुणेरी लाली
विघ्नेश्वरि दुंदिल उदर
धवल मिशा पाहति अमर
हातांत चिमुट तबकीर
भस्माचें चर्चन भालीं–भूमि सिंहासनें खचली
षोडशोपचारें पूजा पावित्र्यें घर तें भरलें,
अगरबत्तिकर्पुरवासें बंगलाबनचि दरवळलें;
त्या निरांजनांतिल ज्योति, स्वर्गीय सौख्यतें नटलें !
ब्राह्मण पूजाही झाली,
आरती गोड गायीली,
नैवेद्य होउनी बसली,
भोजनासि मंडळि सगळी आनंदतरंगें न्हाली !
मालु कौस्तुभमणी शोभे मंगलागौरकरणींत,
नवगुलाब रंगिकपोल फुललेच दीप तेजांत,
त्या गुलाबि शालु प्रभेनें फुलवंति खुलत पंक्तींत;
बालराणि का फुलराणी ?
हृदयांत बागडे हरिणी,
लावण्य देवता कोणी !
नाजुक हळुहळु वेल्हाळा, केवी जनकाची बाळा !
"वहिनि कां अशी अजि रुसली!" मातेसी इंदू वदली;

चाललें चहा पान पुढें—देवतां सुधा ती गमत
" पाहिजे तुला मालति का? घे घोंट एक सर्वांत!"

मालूचा येइ नकार
परि सखि आग्रह अनिवार,
" तव वांचुनि ना घेणार!

आग्रह पाहुनि सर्वांचा—घेइ घोट आनंदाचा!
ठाक ठीक होइ तयारी—पडतसे दहाचा ठोका
" हळद तेल लावुनि अंगा—राजसे अंग धू बरं का!"
जाहला हुकुम बाईंचा—प्रेमाचि खुलत चंद्रीका

सोंवळें नेसुनी सजली,
कंचुकी जरीची ल्याली,
चांफेकळि वरि खुलत फुली,

बैसल्या पूजनासाठीं—इंदु बसे मालू पाठीं;
कॉलेजवेळ जाहाली—वक्तशीर मनमोहन तो
जेवुनी तसाच निघाला—ना विचारपूस करी तो
" मोदकासि थांब जरा ना "—वृद्ध स्त्रि विनोदा श्रवतो

उत्तर दे स्मित हास्यानें
स्वर्ग आनंद लहरीनें
सागर गंभीर दिलानें

मनमोहन ऐसा राजा—अखिलांचा प्यारा कलिजा
भटजींची अतिशय घाई—लग्नांत इतुकि ना झाली

तें चरित्र वर्णूं काय ? देवगुरू स्वारी आली
बर्फाच्छादित शिरशोभे–पगडीचि पुणेरी लाली

विघ्नेश्वरि दुंदिल उदर
धवल मिशा पाहति अमर
हातांत चिमुट तबकीर

भस्माचें चर्चन भालीं–भूमि सिंहासनें खचली
षोडशोपचारें पूजा पावित्र्यें घर तें भरलें,
अगरबत्तिकर्पुरवासें बंगलाबनचि दरवळलें;
त्या निरांजनांतिल ज्योति, स्वर्गीय सौख्यतें नटलें !

ब्राह्मण पूजाही झाली,
आरती गोड गायीली,
नैवेद्य होउनी बसली,

भोजनासि मंडळि सगळी आनंदतरंगें न्हाली !
मालु कौस्तुभमणी शोभे मंगलागौरकरणींत,
नवगुलाब रंगिकपोल फुललेच दीप तेजांत,
त्या गुलाबि शालु प्रभेनें फुलवंति खुलत पंक्तींत;

बालराणि का फुलराणी ?
हृदयांत बागडे हरिणी,
लावण्य देवता कोणी !

नाजुक हळुहळु वेल्हाळा, केवी जनकाची बाळा !
"वहिनि कां अशी अजि रुसली!" मातेसी इंदू वदली;

"बोलत ना कांहीं मजशीं, कां अशी अबोली धरिली?"
मौन धरिति भोजनकालीं ना जाणे ती सोनुकुली ?
" मंगळागौर अजि तुझि ना ?
मग धरावयाचें मौना !
मंगळागौर बोलत ना ! "
समजूत अशी तिचि केली बालिका स्तब्ध मग झाली !

५

( चाल–आजि अक्रुर हा )

मग भोजनकालानंतर करुनि विडे,
घालिती मालतीसि पुढें;
हळु चढति जिना, घेउनियां ताट रुपेरी,
खोंचणिं कुणि अडखळति परी;
देण्यासि विडा सर्व थोर त्या पुरुषां,
लाजत डोकावेचि उषा !
तांबूल देइ विनयानें,
मागते नमस्कारानें,
आशिर्वच मुग्धपणानें,
तो सौभाग्याचा आशीर्वाद मिळे,
प्रेमाचा आनंद रुळे,
त्या गेल्या स्त्राऱ्या सगळ्या बाहेर,
मोकळें मुलींना द्वार;
तें शोभतसे काजळ नयनामाजी
मृगबाळें झुरती आजी !

अधरीं लाली ये लाललाल तांबूलें
मलुल जाहली किति कमलें;
मालुचे अधर लाजविती,
पूर्व पोंवळ्यांची कांती,
त्यांत रंग खेळे वरती
ना उपमा त्या गौरमुखावरि लाली,
कविकाव्यस्फूर्ति उदेली !
कुणि काढिति डाव्या बाजूवरि भांग
वेण्यांनीं नटती सांग !
नवकॉमिनिया ऑइल आणी इंदू
घालिति ‘ चंपकरससिंधू ’ !
वर खोंवियली कलाबतूची वेणी,
थाटमाट तो ना वर्णी !
पातळ जरतारी नेसे,
तंग हरित चोळी हांसे,
पदरासि पीन घट्ट असे,
तें वेणिवरी छान गुलाबी फूल,
ती श्रीमंतीची झूल !
बहु आग्रह हो, तोडे घाली हातीं,
कुसुमकरा नाजुक खुपती,
कंबरपट्याच्या घागऱ्याहि झुमझुमती,
नाचाति अहि तालावरती !

ती दागीन्यांनीं कुणि फुललेलि लता,
भारलेलि मोहनकांता !
विविध रंगि चाले खेळ,
डोकावे मोहनमाळ,
हरितछटा चोळी मेळ,
तो पातळरंग गुलाबी; सोन्याचा
पीतवर्ण अति गमतीचा !
तो चमकीचा लाल लकाके, रंग
दुग्धापरि निर्मळ अंग !
जणुं वाटतसे इंद्रधनू क्रीडतसे,
वपु, वक्षस्थल रंगतसे !
कुंकुमटिकली गालीं सूची अग्रपरी,
मिचमिच करि वरिवरि हंसरी !
मनमोहन जगिं धन्य खरा,
इंद्राची ती इंदीरा,
स्वर्गीय अप्सराच घरा !
हर्षित जीवाला आनंदपार ना उरला,
नवनीतकोमलांगीला !

६

ही विधिघटना साश्चर्यपूर्ण नोहेका ?
नटली तोंच न चंद्रीका !
ये भर्ता गेहीं क्षणिं मित्रांकडुनी,
कधिं कॉलेजांतुनि सुटुनी !

धरि हेका ते "मित्र मित्र म्हणवीसी,
लग्न मेजवानि न देसी !
आमंत्रण नसुनिहि येऊं,
सांभाळ अब्रु तव घेऊं
फंसवणूकसूडचि घेऊं !"
हे अनुरागाचे बोल मनीं हंसले,
हास्याविण कांहिं न दिसलें !
मग मातृज्ञेनें सुहृदां आज्ञापी
सुहृदांसी द्याया कॉफी[1]
घेउनि यशोधना, गायन माडीवरती;
स्त्रीसाम्राज्य परी खलतीं !
सजविति गौरीला खेळ मांडुनी सारा
दिव्य रोषनाइ पसारा !
कागदी देउळें झाडें,
रंगीत कचकडी वाडे,
चिमुकले शोभती घोडे,
लखलखाट तो रमणिय शोभा आणी,
कुंठेल कवीची वाणी !
तो पहा पहा तांडा ये तरुणींचा
रंगिबेरंगि वस्त्रांचा !
तो देखुनियां सकल उभ्या राहाती,
खेळिमेळि स्वागत करिती !

---

१ चहा कॉफी वगैरे.

साधुनि संधी, जा बालराज कोणाचा,
गौरिसामिप; आनंदाचा !
तो लबाड ओढी वाटी,
मुग्धपणें खाउ चपाटी
तों बसली पाठिं चपाटी !
हें जननीनें पाहुनि प्रेमें दिधली,
'दरवडेखोर' हळु वदली !
मनिं झालें तान्हुल्या काय मम न कळे–
बाल्यावस्थेमधिच फळे !
स्वागत समयीं गाई चिमणा रडगाणें
काढि ओंठ केंविलवाणें !
"उगिउगिबाळा ! रे वेल्हाळा गोपाळा,
खेळूंया राजसबाळा ?
हृदयासि ऊत वरि येतां,
कुरवाळी कलिजा माता,
थांबेना रोदनसरिता !
कुणि आयाबाया 'वाजंत्रें म्हणती,
सामोरिं विनोदें येतीं !
हळदी कुंकवाचा समारंभ भाग्याचा
होउनी; अतां हौसेचा–
कुणिं आजीबाइ म्हणे " पिंगा फुगड्या
गाउनी हुकाणा बगड्या !

१ अलीकडे हा उत्साह वृद्ध स्त्रियांतही फार दिसून येतो.

५२८९


अशि लाज कशी मालू धरिशी बाई ?
जोडिदारीण का नाहीं ? ”
‘ दंड फूगडी दंडाची
बाइल माझ्या दादाची ’....
जोडि मालती कांतीची...
मधु लकेरि रागदारि गंधर्वांची
झुमझुमता ती नुपुरांची !

७

( चाल-गेला हो आजि गेला. )

कुणि फुगड्या कुणी पिंगा—
गोडगळां गायन गंगा ॥ ध्रु० ॥
चढाओढिनें म्हणाति बयाणे;
गरगर फिरती गोपिवाणें,
पल्लव, गोंडे चक्रावाणें,
ही क्रीडा चढे रंगा
आकर्षितसे गुणभृंगा ॥ १ ॥
आढेवेढे घेउनि पतीचें
प्रणयिनि लाजत प्राणेशाचें
घेति नांव; हृदिं स्मित परि नाचे
त्यां वाटे मनोभंगा
कुणि नच दे त्यां वचनमुभा ॥ २ ॥

( चाल—रसने न राघवाच्या )

माडीवरी बसोनी मनु हा विनोद ऐके
हो गुदगुदल्या मनांत आल्हाद कविकलीके !
" आटोप मालुबाई घे रमणनांव बाई "
अत्यंत हर्ष होई वधुजात आग्रही ही !
रव येइ तोंच श्रवणीं पिकवाणि दिव्यवाणी
घे नांव छान राणी हो तृप्त स्त्रीशिराणी !
रांगोळि चित्ररूपें सतिलक्ष वेधियेलें.
मग शांति कैंचि जीवा? दृश्योत्सुकाक्ष धाले !
' कमनीयकृति कुणाची ' लसभान ? का सुनेची ?
इच्छासमुन्मनाची चित्राकृती कुणाची
सुस्मीतवदनबाई[१]— कथि वृत्त त्यांसि सहसा
होवोनि पुरति तृप्ती— सद्गुणकथपिपासा* !
सुस्वांत ओळखेना पति नांव रम्य कोरी
दृष्टी सुसूक्ष्म कुठली ? आनंदली चकोरी !
भूषिततनुसतींचे समिरापरी विचार
" काळोखि[२] काय चमके तमिं चांदणी रुचीर ? "
तर्की, करी विचार, पाहूनि कुडिं विचारी ?
कुणि एक स्त्रीविदूषी पाही सतेज न्यारी !
" काधिं घेतलींस मालु ? पतिपारितोषिकाची ?
" नुकतीं कुडीं न शालू आणीलिं मुंबईची " ?
विपर्यी निघालि थट्टा कवणासि बोलवंदी ?

---

१ सुस्मितवदनाच्या रमाबाई; २ हा काळोख कानांवर आलेल्या आंबाड्यांच्या केसांचा.
* रमाबाईंना सुनेच्या कौशल्याची वाखाणणी करण्याची फार संवय होती.

चाले विनोदपट्टा "त्यांनींच"? वदलि मंदी
हळु चापटी कपोलीं मारोनियां तियेच्या
तेथोनि मालु गेली ठेवा तिथें जिवाचा!
मनमोहनासि वाटे गोकूळगोपि केली
तो हरिख वर्णवेना जी काय स्थिति जहाली!

× × × ×

"हो बाइ सांज आतां चल जाउं! वदलि शांता
"काळोख होइ येथें चल क्षिप्र विकट रस्ता!"
लावोनि कुंकु त्यांना "या कधिंतरी बसाया"
वदली तयां रमाई "तुमचीच पाळि याया—
येतें अतां बरं का!" वदली कजाग कोणी
डांबोनि सून ठेवी ह्या उत्सवा न आणी
नवनीत हृदय हाले हो दुःख मालतीला
करि काय ती बिचारी हुरहूर सुमतिबाला!
"रात्रीं तरी तियेसी धाडा तियेसि धाडा
सरुताइसी" त्वरीत ती पुरवि काय लाडा?
साऱ्या निघोनि गेल्या प्रमदा दमोनि गेल्या
परि शांति कैंची जीवा? सुमनेंच ना निघाल्या!
गुलबक्षिदेवि नटली वायूतरांगें झोले
सुमनें सुखें विहार करितातिः चित्त डोले!
रविरंग चारु लीला झिम झीम वृष्टि झाली
द्विगुणींत होइ स्नानें सुषमा खुलोनि आली
सुमनें विवीध रंगी तोडीति प्रेमरंगे

पर्जन्यराज येई बिंबें कपोल रंगे !
दुडदूड द्रुत गतीनें कुमुदाक्षि येति भवना !
कुणि सावरीति पदरा कुणि नीट कच चमूना !

८

( चाल—मी नवबाला )

दिनकर सुषुमा । जा अस्ताला
जा अस्ताला । जा शांतीला
घन तिमिराला । प्रमोद झाला ॥ ध्रु० ॥
हळु हळु जमला । सहाय मेळा
खिजविति मालतिवर गोपाळा !
हास्यलास्य विलसे मुखकमळा
मनु गुलगुलला । खुलला झुलला
महारामिं मनमोहन मुरला ! १
विनंति झाली कविरायाला
फोनो आणा करमणुकीला
गाण्याची आवड आम्हांला
गंधर्वाला—ऐकायाला
अखिल जीव उत्सुक जाहाला ! २
फोनो लावी मोहनराजा
गंधर्वाचा राग कलीजा
डोलविती त्या नवरस चीजा
राजसबाळा करुणा काळा !
खचित ये दया जडहृदयाला ! ३

गायनलोलुपमधुरसि डोले,
गुंग जाहला श्वास न चाले,
तन्मय झाले, वत्सल हाले
करुण युवतिला स्त्री हृदयाला
भालाकाशीं दृश्य जहाला ! ४
गानतृषार्ता हळुच ऐकती
सुभगांचि असे औरच रति ती
ईशचमत्कृति! पुरुषांना ती;
गोड त्यां गळां जणूं कोकिळा
गोपगोपिंला मोह जहाला ! ५

.....................................

निश्चय केला लाजविण्याला!
गंधर्वाच्या रागदारिला,
आरति समयिं त्रास जहाला,
भाव पटविला-गूण नटविला
विस्मय झाला सकल जिवांला ! ६
मालति आरति समयीं गाई
निलय निनादें प्रसन्न होई.
श्वशुर आरती श्रवण्या येई
रजनिपतीला मोद जहाला
गगनीं आला जणुं श्रवणाला ! ७
भोजनसमयीं आग्रह झाला,
नांव घेउनी घाला मनुला

संग्रहालय,
अनुक्रम 98863
विभाग वा.वा.
क्रमांक 9034
नों. दि. 3913



घांस लाडवाचा; मालतिला
पेंचचि पडला कसला असला ?
हर्ष फवारा एक उसळला ! ८
वधुसखि अल्लड कुणि कैवारी
तत्क्षणिं सरसावलि सामोरी
जशी चंचलाचमक अंबरीं,
डोलत चाले हांसत बोले
मनुहि देइका घांस मालुला ? ९
‘ पुरुष हक्क स्त्री वर्गावरतीं
वरपक्ष असे श्रेष्ठ; न गणती
निराधिकारी सूचनेप्रती ’
जलद बोलला—वाद माजला
मोह जाहला मनु मालतिला ! १०

९

( चाल - गज्जल )

विनोदीवादनिष्पत्ती समजुतीनेंच जाहाली
कुणीना घांस कोणाला–शांति नांवामधीं झाली !
श्वासही बंद ठेवीती– ऐकण्या नांव देवाचें
मधुर बोलीसि आतुरते–कृषीवल प्रेम जलदाचे !
चतुरता मधुरता पूर्ण बोलली देवि स्वर्गींची
तृषार्ता तृप्ति लाभोनी वृष्टि जाहालि स्तोत्राची

१ मालती.

सभा लज्जीत होवोनी  कधीं हा पाठ वा दिसी ?
पुसति मनमोहनासी ते  'रसालंकारकाव्यासी !'
रंगले तांबुलें सर्व  फवारे उडति हास्याचे
सुचेष्टातटिनि वाहतसे—स्नात हो देव[1] स्वर्गीचे !
गजबजे माळि आवाजे  जमे का गमत राष्ट्रसभा;
राज्य घेती सुरेशाचें ?  पहातो देवदूत नभा
मनोराज्योदधी लहरी  संवगडी हृदयगगनांत,
कवीहृत्कल्पना उठली  अहाहा धन्य वच येत
गंझिफा सोंगट्या पत्ते  बैसती खेळ खेळाया
स्वाभिमान स्वपक्षाचा  सुरासुर इंद्रपद घ्याया !
किती राजे प्रधान, छबू  कोट लाडूसि नाहिं मिती,
रमणिही विविध खेळांनीं  जिवासी रंजवीताती !
चहाचे डोस किति वेळां  तरतरी यावया खेळां
हो उषःकाल ना कळला  रमति निद्रा सुवेल्हाळा !
प्रभातीं स्नान होवोनी  मंगलागौरिची पूजा[2] !
करीती भामिनी हास्यें  विनविती देवि सुखभाजा !
'त्वत्पदांबूजनतबाला  स्वसौभाग्यासि चिरकाला
देइ माई विनंती ही  करावा देव प्रतिपाळा !
वाहवी गौर गंगेंत  फुलारा नीर रंगवितो,
इंद्रआरामतरु डोले ?  फुलांचा पेर पसरीतो ?
कचचमूवरति नटवीती  मुदें केतकिदलें दयिता,
प्रसादा सेवनातुरत्या  अल्पहारें[3] जिवा क्षमता !

१ पतिदेव २ उत्तरपूजा ३ अल्पउपहार

निघाति निजसदनिं जायाला— घे निरोप प्रहर्षाचा
विधिकृपाभार मानीती— मंगलासुदिन वर्षाचा !
नलिनि, मालीनि, शालीनी इंदु, सिंधू, कमू, सुशिला,
प्रभा, शांता, सुहा, कांता वत्सला, सुमन, मनु, प्रमिला
उषा, तारा, निषा शरयू निघाली युवतिसेना ती
मोहिला मेघराज मनीं सुकोनी रम्य होइ क्षिती !
अहा डोकावतो तरणी त्वरेनें चालल्या रमणी
सुवर्णें खुलवितो नलिनी अंतरीं म्हणाति ‘प्रभुकरणी’ !

१०

सानंदोत्सव स्त्रीपुरूष सकलां हो मंगलागौर ही
गेला वेळ न जाणवे झरझरा उल्हासपूर्णा मही !
खेळीमेळि जमोनि केलि करिती प्रेमाभरें तीं फुलें
नांदे सौख्यप्रमोदमूर्ति सदनीं; ‘वैराग्यकाया डुले’ !
लक्ष्मी ये गृहिं मालती न श्वशुरा सासूसिही वाटतें
स्वर्गाचें घरिं राज्य आणुनि वधू ऐश्वर्य हें थाटतें !
धन्योद्गार श्रुतीपथिं जनकमातेच्या भिडोनी त्वरें
केला बेत दिवाळिसी अणविण्या जामात अत्यादरें !
स्वरूपें दे शोभा अनुरुपगुणें सर्व महिला
सतेज ही भासे विभुषित करी; रत्न महिलों
जिचा लावण्याचा नवरस अलंकारप्रतिमा
प्रतीसी सौंदर्य स्रावित; सुखा नाहिं उपमा !

अनुक्रम
विभाग
क्रमांक
१ स्त्रीसा २ पृथ्वी
नो. दि.
५२८९